इयत्ता ११ वी १२ सुधारीत विषय योजना
व मूल्यमापन योजना.

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१२१/एसडी-४.**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२२.

वाचा :- १. शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१९/प्र. क्र. (२४३/१९ )/एसडी-४, दि. ८ ऑगस्ट,२०१९
२. शासन शुद्धीपत्रक क्र.अभ्यास-२११८/प्र.क्र.२४३/एसडी-४, दि. ११ नोव्हेंबर,२०१९
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र. क्र. ९/एसडी-४, दि. १८ जानेवारी,२०२१
४. शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.२०२/एसडी-४, दि. २० ऑक्टोबर,२०२१

**प्रस्तावना :**

शालेय शिक्षण विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र. १ मधील दि. ८ ऑगस्ट, २०१९ च्या शासन निर्णयानुसार इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी करिता सुधारित विषययोजना व सुधारित मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये संदर्भ क्र. २ मधील शासन शुध्दीपत्रक व संदर्भ क्र. ३ व ४ मधील शासन निर्णयाद्वारे वेळोवेळी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील विविध घटकांची मागणी विचारात घेऊन १) विज्ञान शाखेसाठी Group C मधून वगळण्यात आलेल्या शिक्षणशास्त्र विषयास प्रविष्ट विद्यार्थ्यांना सन २०२२ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इयत्ता १२ वी ) परीक्षेस बसण्याची संधी देणे २) Group B व Group C मधून घ्यावयाच्या वैकल्पिक विषयांच्या संख्येच्या मर्यादांचा फेरविचार करणे इ. बाबी शासनाच्या विचाराधीन होत्या.

**शासन निर्णय :**

या अनुषंगाने इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी च्या विषययोजनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**कला व वाणिज्य शाखांसाठी -**

१) विषययोजनेत कला शाखेसाठी शिक्षणशास्त्र हा विषय Group C मध्येच समाविष्ट असेल.

२) कला व वाणिज्य शाखांसाठी आठ विषयांची निवड करताना Group A मधील चार विषय पूर्वीप्रमाणे अनिवार्य असतील.

३) उर्वरित चार वैकल्पिक विषयांची निवड करताना Group B मधून किमान दोन विषय निवडावे लागतील आणि

४) उर्वरित दोन विषयांसाठी Group B मधून शून्य, एक किंवा दोन आणि Group C मधून शून्य, एक किंवा दोन या मर्यादेत Group B व Group C मधून एकूण दोन विषयांची निवड करता येईल.

**विज्ञान शाखेसाठी -**

विज्ञान शाखेसाठी शिक्षणशास्त्र हा विषय Group C मधून वगळण्यात आलेला आहे, परंतु विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वीच्या विषय योजनेनुसार विषयांची निवड केलेली आहे त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये म्हणून विज्ञान शाखेसाठी Group C मधून वगळण्यात आलेल्या शिक्षणशास्त्र विषयास प्रविष्ट विद्यार्थ्यांना सन २०२२ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) परीक्षेस बसण्याची एकमेव संधी देण्यात येत आहे. तथापि सदर परीक्षेमध्ये शिक्षणशास्त्र विषयात विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास त्या विद्यार्थ्यांना पूर्वीच्या विषययोजनेनुसार तोच विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होता येईल.

शैक्षणिक वर्ष सन २०२१-२२ पासून इयत्ता ११ वी व शैक्षणिक वर्ष सन २०२२-२३ पासून इयत्ता १२ वी साठी अशी सवलत देय असणार नाही.

सदर शासन शुद्धीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२२०२२५१५२००८२७२१ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SCHOOL EDUCATION & SPORT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, serialNumber=77a529748c5e7c1ba7a66e81c654ba3c492fda5b29e076241db1ba213ddedf4e, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2022.02.25 15:24:00 +05'30'

**(इ. मु. काझी)**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.मंत्री,शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव,
२. मा.राज्यमंत्री,शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव,
३. मा.अपर मुख्य सचिव,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
४. आयुक्त (शिक्षण),महाराष्ट्र राज्य,पुणे,
५. अध्यक्ष,माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,महाराष्ट्र राज्य,पुणे,
६. सचिव,राज्य मंडळ,पुणे,
७. संचालक,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे
८. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे,
९. सर्व विभागीय अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

१०. सर्व विभागीय सचिव, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
११. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद ( सर्व ),
१३. शिक्षण निरीक्षक,मुंबई (पश्चिम,दक्षिण,उत्तर),
१४. निवड नस्ती (कार्यासन-एसडी-४).